Q.P.Code: 38950

वेळ – ३ तास गुण - १००

---

सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न १. (अ) भरतमुनींचे रससूत्र सविस्तर विशद करा. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. आनंदवर्धनाचा ध्वनिसिद्धांत.

२. कुंतकाचे वक्रोक्ती वर्गीकरण.

प्रश्न २. (अ) प्लेटोच्या अनुकृतिसिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करा. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. वामनाची रीती संकल्पना.

२. क्षेमेंद्राचा औचित्यविचार.

प्रश्न ३. (अ) साहित्याची भाषा म्हणून व्यंजना शब्दशक्तीचा परिचय करून द्या. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. प्रतिमा : साहित्याची भाषा.

२. काव्यातील छंद आणि मुक्तछंद.

प्रश्न ४. (अ) साहित्यनिर्मितीच्या मुळाशी असणाऱ्या 'प्रतिभा'या काव्यकारणाची चर्चा करा. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. कोलरिजचा कल्पनाशक्ती सिद्धांत.

२. व्युत्पत्तीचे काव्यनिर्मितीतील स्थान.

प्रश्न ५. (अ) मम्मटाच्या काव्यप्रयोजन विचाराचा सविस्तर परामर्श घ्या. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. आत्माविष्कार : एक साहित्यप्रयोजन.



9F85E57755816F14DC7954CBB5699612

२. सामाजिक बांधिलकी : एक साहित्यप्रयोजन.

प्रश्न ६. (अ) अभिनवगुप्ताच्या रसनिष्पत्तीविषयक विचाराचे विवेचन करा. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. कॅथार्सिस : विरेचनवादी भूमिका.

२. रिचर्डस्‌ची प्रेरणासंतुलन संकल्पना.

प्रश्न ७. (अ) समीक्षा म्हणजे काय ते सांगून, साहित्यसमीक्षेचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा. (१२)

किंवा

(आ) टिपा लिहा.

१. समीक्षेतील 'विश्लेषण' संकल्पना.

२. समीक्षेचे कार्य.

प्रश्न ८ . पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. (१६)

१. कुंतकाच्या साहित्यशास्त्रविषयक ग्रंथाचे नाव सांगा.

२. आनंदवर्धनाने काव्याचे प्राणतत्त्व कशास मानले आहे?

३. 'रीतिरात्मा काव्यस्य:' ही संकल्पना कोणी मांडली आहे?

४. क्षेमेंद्राने औचित्यविचाराची मांडणी करताना काव्यविषयक किती मर्मस्थाने सांगितली आहेत?

५. 'कला ही सर्जनशील अनुकृती असते' हा सिद्धांत कोणी मांडला ?

६. पाश्चात्य विचारवंत प्लेटोने अनुकृती सिद्धांत कोणत्या ग्रंथातून मांडला आहे?

७. अभिधा शब्दशक्ती मधून व्यक्त होणाऱ्या अर्थास काय म्हणतात?

८. काव्यातील 'वृत्त' म्हणजे काय ते सांगा.

९. 'नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' अशी प्रतिभेची व्याख्या कोणी सांगितली आहे?

१०. 'कारयित्री' व 'भावयित्री' असे प्रतिभेचे दोन प्रकार कोणी सांगितले?

११. कोलरिजने कल्पनाशक्तीचे किती प्रकार मानले आहेत?

१२. 'शिवेतरक्षतये' हे साहित्य प्रयोजन कोणी सांगितले आहे?

१३. 'कॅथार्सिस' या संकल्पनेचा विशुद्धीकरणवादी अर्थ कोणी सांगितला?

१४. 'उपचित(परिपुष्ट) स्थायी म्हणजे रस' हा विचार कोणी मांडला आहे?

१५. रसास्वादासंबंधी 'रसविघ्ने' ही संकल्पना कोणी सांगितली आहे?

१६. 'साहित्याच्या आस्वादामुळे मानवी इच्छा व प्रेरणा यांचे समाधान होते' ही भूमिका कोणी मांडली?

------------------------------